ड

FORM-1 A

N.C.R.B.
I.I.F.

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र State, जिल्हा मुंबई District, पोलीस ठाणे ला.प्र.वि. मुंबई विभाग Police Station, पहिली खबर क्र. ३४/२०१८ FIR No., वर्ष २०१८ Year, दिनांक २६/१०/२०१८ Date

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र.(सं.) अधिनियम २०१८, कलमे Sections ७
   (ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार मंगळवार, तारीख पासून २३/१०/१८, वेळ ........, तारीख पर्यंत २४/१०/२०१८, वेळ १७.५२
   Occurrence of offence : Day, Date from, Time, Date to, Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याचा Information received at P.S. तारीख Date २४/१०/२०१८, वेळ Time १३.३०
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ........, तारीख Date २६/१०/२०१८, वेळ Time ........

4. माहितीचा प्रकार Type of Information : ........, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence : (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P.S. ........, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. Chouki/Beat/O.P. Name and No. ........
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name इमारत व कारखाने विभाग, ५ वा मजला, बृहन्मुंबई महानगर पालिका, एन वॉर्ड घाटकोपर (पूर्व), मुंबई - ७७ No. if any, Ward, रस्त्याचे नाव Name of road
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable Place ........, गाव Village ........, पोस्ट Post ........, तालुका Taluka ........, जिल्हा Distt. ........, राज्य State ........
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........, तालुका Taluka ........, जिल्हा Distt. ........, राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name मोहम्मद रफी शेख (b) वडीलाचे / पतीचे नाव Father's /Husband's Name अब्दुल गनी शेख
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age ५८ वर्ष (d) राष्ट्रीयत्व Nationality ........ फोन नं. Phone No. ........
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation ........
   (g) धर्म Religion मुस्लिम जात Caste ........ पोटजात Sub-Caste ........
   (h) पत्ता : फ्लॅट नं. ७०४, टॉवर नं. ३ आर्चिड रेसिडेन्सी, आर सिटी मॉल जवळ, घाटकोपर (प) मुंबई ८६
   Address : गल्ली / सर्व्हे नं. Ward, घर / नाव नंबर House/Name No., फोन / मो. नंबर Phone/M. No., पॅन नं. Pan No., वोटर्स नं. Card No.
   रस्त्याचे नाव Road ........ जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........ गाव Village ........ पोस्ट Post ........ पो. स्टे. P. Stn. ........
   तालुका Taluka ........ जिल्हा Distt. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)
   १) सादिक हमीद खान, वय ३८ वर्ष धंदा - नोकरी (सहायक अभियंता)
   २) दयानंद रमेश कुर्पेकर, वय ३८ वर्ष, धंदा - नोकरी (कनिष्ठ अभियंता)
   दोघे नेम. बृ.मुं.म.न.पा., इमारती व कारखाने विभाग, एन वॉर्ड, घाटकोपर (पू) मुंबई - ७७

ASSTT. COMMISSIONER ANTI-CO...

Scanned by CamScanner

निवेदन

दिनांक - २६/१०/२०१८

याकामी फिर्यादी नामे मोहम्मद रफी अब्दुल गनी शेख, वय ५८ वर्षे, यांनी स्वतंत्र पानावर टंकलिखित केलेली फिर्याद ही गुन्ह्याची प्रथम खबर संबोधण्यात येत आहे. ती सोबत जोडण्यात आलेली आहे.

समक्ष,

(initials) 26/10/18

(सपना क्षिरसागर)
पोलीस निरीक्षक
[illegible] प्रतिबंधक विभाग
मुंबई

Mohd 26/10/2018

426

COMMISSIONER OF POLICE ANTI CORRUPTION BUREAU
सत्यमेव जयते
MUMBAI

8\. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ...... तात्काळ
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9\. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

रु. 25,000/-

10\. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य ......
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11\. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : ......
Unnatural / Accidental Death Case No., if any

12\. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

बाजूस नमूद तारीख, वेळी व ठिकाणी फिर्यादि यांच्या हॉटेलच्या डिमॉलिश केलेल्या भागावर लाकडी शेड व ताडपत्री लावण्यासाठी 'एन' वॉर्ड बृ.मनपा कार्यालयाकडे परवानगी मागितली असता सहा.अभियंता सादिक खान व कनिष्ठ अभियंता दयानंद कुमेकर यांनी रु.50,000/- लाचेची मागणी करून कनिष्ठ अभियंता दयानंद कुमेकर यांनी काम करण्या पूर्वी रु.25,000/- लाचेची मागणी करून स्विकारली म्हणून गुन्हा कलम 7 भ्र.प्र.(सं) अधिनियम 2018 अन्वये दाखल.

13\. **केलेली कार्यवाही :-** 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : पो.नि. सपना क्षिरसागर

2\. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ......

3\. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ...... , जिल्हा ...... , राज्य ...... ,
Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ................ Rank................ No. .............
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to .................................................. (3) Transferred to P.S .........................................,
District ............................ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.
F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.
(R.O.A.C.)

[illegible] 26/10/2018

[illegible] 26/10/18

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ...... सपना क्षिरसागर
पदनाम Rank ...... पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड. क्र. ......
Posting
Code No. of I. O. ............................

14\. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

15\. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ......
1\. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4.तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned by CamScanner

<u>फिर्याद</u> दि. २६/१०/२०१८.

श्री. मोहम्मद रफी अब्दूल गनी शेख, वय—५९ वर्षे, धंदा—व्यवसाय, रा.ठि. फ्लॅट नं. ७०४, टॉवर नं.३, ऑर्चिड रेसिडेन्सी, आर.सी.टी. मॉल जवळ, घाटकोपर (पश्चिम), मुंबई— ४०००८६. मो.क्र. ९८६७३१६३९८

........

मी, वरील प्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर सन २०१२ पासून माझ्या कुटुंबासहरहावयास आहे. माझा साईन बोर्ड तयार करण्याचा व्यवसायअसून सदर दुकान 'गनी आर्टस्' शॉप नं. ३, १० नंबर चक्कीचे समोर, पंतनगर, घाटकोपर (पुर्व), मंबई—४०० ०७५ या ठिकाणी आहे. तसेच माझा पटेल चौक, व्होडाफोन गॅलरी, बाबूनंदन चाळ, ६० फुट रोड, घाटकोपर (पूर्व) मुंबई— ४०००७७ या ठिकाणी एक गाळा असून सदर गाळा मी श्री. रुचीत श्रॉफ, यांना भाडयाने दिलेला आहे. सदर गाळयामध्ये ते 'हॉटेल जलसा' नानुमल भोजराज या नावाने हॉटेलचा व्यवसाय करत आहेत. माझे साईन बोर्ड तयार करण्याच्या व्यवसायामधुन मिळणारे पैसे व भाडयाने दिलेल्या गाळयाचे मिळणारे भाडे यामधून मी माझे कुटूंबाचा उदरनिर्वाह करत आहे.

मी दिनांक ०८/१०/२०१८ रोजी 'एन' वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, घाटकोपर (पूर्व),मुंबई येथे बाबूनंदन चाळ, पटेल चौक येथे असलेल्या माझ्या हॉटेलच्या गाळयाच्या डिमॉलीश केलेल्या भागावर लाकडी फ्रेम तयार करुन त्यावर ताडपत्री लावण्यासाठी परवानगी मिळणेसाठी विनंती अर्ज केला होता. मी केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने काही दिवसानी एन वॉर्ड, मनपा कार्यालयातील कनिष्ठ अभियंता श्री.कुचेकर यांनी माझे हॉटेल गाळयाची पाहणी केली. सदर ठिकाणी पाहणी केल्यानंतर श्री.कुचेकर यांनी मला कार्यालयात येवुन सहाय्यक अभियंता श्री.सादीक खान यांना भेटण्याबाबत सांगितले. श्री. कुचेकर यांनी सांगितल्याप्रमाणे मी दि.२३/१०/२०१८ रोजी 'एन' वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, घाटकोपर (पूर्व),मुंबई येथील सहाय्यक अभियंता श्री.सादिक खान यांचेकडे मी केलेल्या अर्जाच्या संदर्भात परवानगीसाठी भेटलो असता त्यांनी कनिष्ठ अभियंता श्री. दयानंद कुचेकर यांना त्यांचे कक्षात बोलावून माझे काम करुन देण्यास सांगितले. त्यानंतर मी श्री. कुंचेकर यांच्याबरोबर जावुन कामासंदर्भात बोलणी करीत असतानात्यांनी गाळयाचेवर ताडपत्री टाकण्याचे परवानगीसाठी रु. ५०,०००/— द्यावे लागतील.सदर रक्कम काम सुरु करण्यापूर्वी रु. २५,०००/—व काम पुर्ण झाल्यानंतर रु. २५,०००/— द्यावे लागतील असे सांगितले.

एक दक्ष नागरीक म्हणून मला, श्री. सादिक खान व श्री. कुचेकर यांना माझे कामासाठी लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक २४/१०/२०१८ रोजी १३.३० वाजणेचे सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे लेखी तक्रार दिली. माझ्या लेखी तक्रारीवरुन पोलीस निरीक्षक श्रीमती. सपना क्षिरसागर व सपोआ.विजयकर यांनी दोन शासकिय पंचाना बोलावून त्यांचे समक्ष मी दिलेल्या तक्रारीस अनुसरुन पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. पो.नि. क्षिरसागर यांनी माझ्या तक्रारीची पडताळणी करण्याकरीता दोन शासकीय पंचाना पाचारण केले. पो.नि. क्षिरसागर यांनी मी त्यांच्याकडे दिलेला तक्रार अर्ज पंचाना दाखविला. सदरचा अर्ज पंचानी वाचून त्यावर सहया केल्या तसेच पो.नि. क्षिरसागर यांनी समक्ष सही करून सदरचा तक्रार अर्ज आपल्या ताब्यात घेतला.

त्यानंतर सपोआ विजयकर, पो.नि. क्षिरसागर, दोन शसकिय पंच व सापळा पथकातील अंमलदार यांचेसह दोन शासकिय वाहनाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथून दुपारी रवाना झालो व घाटकोपर (पश्चिम) येथे हिंदू सभा

Scanned by CamScanner

हॉस्पीटल येथे येवून पोहचलो. सदरठिकाणी सपोआ विजयकर यांनी व्हाईस रेकॉर्डर चालू करुन तो माझ्या शर्टचे आतील बाजुस लावले. त्यानंतरमी पंच, श्री. कंचेवाड यांच्यासह लोकसेवक यांना भेटण्यासाठी एन वॉर्ड येथे चालत गेलो. तेथील ५ व्या माळयावरील श्री. सादिक खान यांचे कक्षात जावुन त्यांना भेटलो व श्री कुचेकर यांनी रू.५००००/— ची मागणी केल्याचे व काम सुरू करण्याआधी रू २५०००/— देण्याबाबत सांगतले असता श्री. सादिक खान यांनी ठिक आहे असे बोलले. त्यानंतर मी श्री दयानंद कुचेकर यांना भेटुन श्री. खान यांच्याबरोबर झालेले संभाषणाबाबत बोललो असता त्यांनी रू २५०००/— घेवुन येण्यास सांगीतले. मी त्यांच्याकडुन अर्ध्यातासाचा अवधी मागीतला असता त्यांनी ६.०० वाजेपर्यंत येण्यास सांगीतले. त्यानंतर मी तेथुन सापळा पथक थांबले होते त्याठिकाणी येवुन पोहचलो. सदर ठिकाणी पो.नि. क्षिरसागर व पंचानी डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण पोलीस वाहनामध्ये पो.नि क्षिरसागर तसेच पंचांनी ऐकले असता, लोकसेवकांनी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

मला श्री. कुंचेकर यांनी ०६.००वा. पर्यत कार्यालयात पैसे घेवून येण्यास सांगितले होते. परंतुमला पोहचायला उशीर होणार असल्याने ते कार्यालयात आहेत किंवा कसे याची खात्री करण्यासाठी मी माझे मोबाईलवरुन श्री. कुंचेकर यांचेशी सायंकाळी ०६.१५वा. भ्रमणध्वनी क्र.९९६९६३३१७० वर संपर्क केला. त्यावेळी मी पैसे घेवून कोठे येवू अशी विचारणा केली असता त्यांनी ते आफिसमधून निघाले असून उद्या सकाळी १०.००वा. फोन करुन येण्यास सांगितले.

लोकसेवक श्री.कुचेकर यांनी दुसऱ्या दिवशी बोलाविले प्रमाणे पो.नि.क्षिरसागर व सपोआ.विजयकर यांच्या सुचनेप्रमाणे मी सापळा पथकास दिनांक २५/१०/२०१८ रोजी सकाळी. हिंदू सभा हॉस्पीटल, घाटकोपर (पश्चिम),मुंबई येथे भेटलो. श्री. कुंचेकर यांचे सांगणेप्रमाणे पो.नि.क्षिरसागर यांच्या सुचनेवरुन श्री.कुंचेकर यांच्या भ्रमणध्वनीवर सकाळी १०.१५ वा. चे दरम्यान संपर्क साधला परंतु त्यांनी फोन उचलला नाही. त्यानंतर काही वेळाने श्री.कुचेकर यांचा मला फोन आला असता त्यांनी सायंकाळी ५.०० ते ०६.००वा. चे दरम्यान फोन करुन येण्यास सांगितले. त्यानुसार मी सायंकाळी ०४.४५ वा.चे दरम्यान श्री.कुचेकर यांना मोबाईलवर संपर्क साधला असता त्यांनी कार्यालयात येण्यास सांगितले. सदर वेळी सपोआ विजयकर यानी मला व उपास्थित दोन्ही पंचाना यापुढे करण्यात येणाऱ्या सापळा कारवाईच्या अनुषंगाने सविस्तर माहिती देवुन सापळापुर्व कारवाई करण्यात आली. तसेच त्यावेळी मला लोकसेवक यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम स्विकारल्यास त्याबाबतचा पुर्वनियोजित इशारा म्हणुन पोनि.क्षिरसागर यांचे मोबाईल फोनवर मिसकॉल करण्याबाबत सुचना दिली. त्यानंतर लोकसेवक यांना भेटण्यासाठी पंचासह मनपा कार्यालयात रवाना झालो. मनपा कार्यालयातील ५ व्या माळयावर लोकसेवक श्री.कुचेकर यांच्या कक्षामध्ये गेलो व त्यांनी मागणी केलेली रक्कम खिशामधुन बाहेर काढली असता 'खुले क्यु लाया' असे बोलला असता गीनके लो असे मी त्यांना म्हणालो. व सदरची रक्कम त्यांच्यापुढे

समक्ष,

26/10/18

( सपना क्षिरसागर )

पोलीस निरीक्षक,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Mohd 26/10/2018

Scanned by CamScanner

केली असता त्यावेळी लोकसेवक श्री.कुचेकर यांनी ती स्विकारून पॅन्टच्या उजव्या खिशामध्ये ठेवली. त्यांनतर मी ठरल्याप्रमाणे पोनि.क्षिरसागर यांना लाचेची रक्कम स्विकारल्या बाबतचा त्यांचे मोबाईलवर मिसकॉल देवुन ,पुर्वनियोजित इशारा दिला. त्यांनतर सापळा पथकाने लोकसेवक श्री.कुचेकर यांना रंगेहाथ पकडले.त्यानंतर बाजुच्या कक्षामध्ये असलेल्या श्री.सादिक खान यांनाही ताब्यात घेतले.

तरी माझे हॉटेलच्या गाळयाच्या डिमोलिश केलेल्या भागावर लाकडी शेड उभारुन त्यावर ताडपत्री लावण्याची एन वॉर्ड, मनपा कार्यालय, घाटकोपर पुर्व मुंबई यांच्याकडे परवानगी मागीतली असता सहाय्यक अभियंता, सादिक खान, व कनिष्ठ अभियंता, दयानंद कुचेकर यांनी रु. ५०,०००/– लाचेची मागणी केल्यानुसार काम सुरु करण्यापुर्वीचे रु. २५,०००/–लाचेची मागणी करुन श्री.कुचेकर यांनी स्विकारली म्हणुन माझी श्री. सादिक खान, सहाय्यक अभियंता व श्री. दयानंद कुचेकर, कनिष्ठ अभियंता (इमारत व कारखाने), एन वॉर्ड, बृ.म.न.पालीका, घाटकोपर (पूर्व) मुंबई यांचेविरुध्द कायदेशिर कारवाई करण्याची विनंती आहे.

माझा वरील जबाब लॅपटॉपवर मराठीत टंकलिखीत केला असून तो मला वाचुन दाखवुन हिंदीमधुन समजावनु सागितला असता तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

26/10/18

( सपना क्षिरसागर )

पोलीस निरीक्षक,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Mohd 26/10/2018

Scanned by CamScanner